



रयत शिक्षण संस्थेचे,

# महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल. जि. रायगड – ४१०२०६

Accredited at 'A' Grad by NAAC (Third Cycle CGPA – 3.18)

'Best College Award' By University of Mumbai


## मराठी विभाग आयोजित

## एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

# "जागतिकीकरण आणि मराठी साहित्य प्रवाह"

## बुधवार दि. २८ मार्च २०१८

# शोधनिबंध पुस्तिका



**संपादक**

प्रा. चिंतामण धिंदळे

मराठी विभाग प्रमुख

**प्रकाशक**

प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर

महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल

जि. रायगड – ४१०२०६

ISBN NO :978-93-5311-692-7

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शोधनिबंधाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ३४ | जागतिकीकरणात अस्तित्वशोधाची मांडणी करणाऱ्या मुस्लीम कविंच्या कविता | डॉ. केतकी भोसले | ९७- ९७ |
| ३५ | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा. बाळासाहेब देविकर | ९८ – १०० |
| ३६ | जागतिकीकरण आणि आंबेडकरवादी साहित्य प्रवाह | प्रा. सोपान पवार | १०१ – १०२ |
| ३७ | जागतिकीकरण आणि आंबेडकरी कविता | प्रा. डॉ. माधवी खरात | १०३– १०४ |
| ३८ | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्यप्रवाह | प्रा. डॉ. दीपक गायकवाड | १०५ – १०६ |
| ३९ | जागातीकीकारानाच्या परिणामाची निवडक महानगरी नाटकं (२००५-२०१५) | प्रा. अरविंद जाधव | १०७ – १०८ |
| ४० | जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कविता | प्रा. विजय शिंदे<br>प्रा.संतोष बोंगाळे | १०९ – १११ |
| ४१ | भाषा शिक्षणाच्या मांडणीतील ज्ञानरचनावाद | डॉ .भानुदास शिंदे . | ११२ – ११४ |
| ४२ | सह्याद्री खोऱ्यातील आदिवासी जमातीचे वेगळेपण | डॉ.आर. पी. म्हात्रे | ११५ – ११७ |
| ४३ | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य प्रवाह | प्रा.निलांबरी झगडे. | ११८ – १२० |
| ४४ | जागतिकीकरण आणि संतोष पद्माकर पवार यांच्या कवितेतील जाणिवा | प्रा.प्रवीण भोसले | १२१– १२३ |
| ४५ | मराठी स्त्रीवादी कविता आणि जागतिकीकरण | डॉ. मानसी लाटकर | १२४ – १३० |
| ४६ | जागतिकीकरण आणि महानगरीय कविता | प्रा.जयवंत सुतार | १३१ – १३३ |
| ४७ | जागतिकीकरण, स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहित्य | डॉ.महालक्ष्मी मोराळे | १३४ – १३७ |
| ४८ | जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कथा | डॉ.दिनकर कुटे | १३८ – १४० |
| ४९ | जार्गतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कादंबरी | प्राचार्य डॉ. आशा मुंढे | १४१ – १४३ |
| ५० | प्रा. जागतिकीकरण आणि पसायदान | डॉ. जया कदम | १४४ १४५ |
| ५१ | जागतिकीकरण आणि स्त्री–लिखित मराठी कादंबरी | डॉ. प्रवीण ताटे देशमुख | १४६ – १४८ |
| ५२ | जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कविता | प्रा. रावसाहेब पाटील | १४९ – १५० |
| ५३ | भटक्या विमुक्तांचा साहित्यिक प्रवाह : जागतिकीकरणाच्या संदर्भात | प्रा. किरण सर्जेराव पवार | १५१ – १५२ |
| ५४ | जागतिकीकरण आणि सुनील अभिमान अवचार यांची कविता | प्रा. निकिता विचारे | १५३ – १५६ |
| ५५ | जगतिकीकरण आणि मराठी कवितेचे स्वरूप | डॉ. मनीषा बनसोडे | १५७ – १५९ |
| ५६ | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | डॉ. सौ. जयदेवी पवार | १६० -१६२ |
| ५७ | जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कादंबरी | प्रा. उमेश सिरसट | १६३ – १६७ |
| ५८ | जागतिकीकरण आणि ग्रामीण मुस्लिम मराठी काव्य | डॉ.देवराव राठोड | १६८ – १७० |
| ५९ | जागतिकीकरण आणि ग्रामीण कथा साहित्य प्रवाह | प्रा.विवेक कोल्हे | १७१ – १७२ |
| ६० | समकालाचा वेध घेणारी ग्रामीण कविता : भुईषास्त्र, येठण, जमिन कसण्याची कला. | प्रा.निलम बागुल | १७३ – १७९ |
| ६१ | जागतिकीकरणआणि 'एसईझेड' कादंबरी | डॉ.सौ.कांचन नलवडे | १८० – १८३ |
| ६२ | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा. कल्पना गावडे | १८४ – १८६ |
| ६३ | डॉ.रवींद्र शोभणे यांच्या ग्रामीण कादंबऱ्या आणि जागतीकीकरण | प्रा. सारीका मोहिते | १८७ – १८८ |
| ६४ | १९९० नंतरच्या बदलत्या प्रतिमा | प्रा. चंद्रशेखर घुगे | १८९ – १८९ |
| ६५ | जागतिकीकरणाचे मूल्यभान नंतर आलेले लोक | प्रा. विजयकुमार घोडके | १९० – १९२ |

# जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कविता

प्रा. विजय शिंदे                                        प्रा.संतोष

**प्रास्ताविक :**

कोणतेही साहित्य हे तत्कालीन घडामोडीचा समाजजीवनावर झालेल्या परिणामांचा वेध घेत असते. बदलत्या विचाराचा ठसा साहित्यातून उमटत असतो. सन १९९० नंतर जागतिकीकरणाचा प्रभाव व परिणाम संपूर्ण जगावर झाल्याने त्यास भारत अपवाद नाही. खाजगीकरण, आर्थिक उदारीकरण आणि जागतिकीकरण (खाउजा) धोरणाचा भारत देशाने अवलंब केला आणि त्याचे पडसाद वा परिणाम सर्वच क्षेत्रावर झाले. साहित्यावरही जागतिकीकारणाचा परिणाम झाल्याने साहित्यात अनेक वेगवेगळे प्रवाह आणि विचारमंथन होऊ लागले. प्रामुख्याने मराठी कविता आणि मराठी ग्रामीण कवितेवर खाउजा धोरणाचा झालेला गंभीर परिणाम त्यामुळे संपूर्ण ग्रामीण भाग ढवळून निघाला. त्याचे प्रतिबिंब मराठी ग्रामीण कवितेत कशा पद्धतीने चित्रित झाले आहे. याचे विश्लेषण प्रस्तुत 'जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कविता' या शोधनिबंधामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोध निबंधाचा उद्देश :**

जागतिकीकरण म्हणजे काय? व त्याचा खेड्यावर झालेला परिणाम कोणता? याचा अभ्यास करणे.

जागतिकीकरण संकल्पना वा स्वरूप अभ्यासणे.

जागतिकीकरणामुळे ग्रामीण कवितेत झालेला बदल पाहणे.

१९९० नंतरची ग्रामीण कविता याचे विश्लेषण करणे.

**जागतिकीकरण संकल्पना :**

जागतिकीकरण या संकल्पनेविषयी उत्तम कांबळे म्हणतात की," जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने आता पृथ्वी नावाच्या ग्लोबवरील सर्व मानवी जीवनाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने व्यापून टाकले आहे. आर्थिक सुधारणा, वैश्विक खेडे, माहितीचे युग, तंत्रज्ञानाचा स्फोट, ज्ञानाच्या बँका आणि बाजारपेठा, एक कायदा एक कोर्ट, एक भूगोल एक न्याय, संपत्तीचे विकेंद्रीकरण, कायद्याचा संकोच, वस्तूंचा सर्वत्र सुलभ, हव्या त्या गोष्टी हव्या त्या ठिकाणी, हव्या त्या वेळेला मिळणाऱ्या वस्तू, चलनाचा मुक्त संचार, भांडवलाचा सहज विकास, मुबलक वस्तू, मुबलक व्यक्ती, स्वातंत्र्य, खाजगीकरण, औद्योगीकीकरण, उदारीकरण अशी वेगवेगळी नावे धारण करत ही प्रक्रिया सुरु झाली.[१] या विधानानुसार जागतिकीकरण ही संकल्पना आपणाला नेमकेपणाने उमगते.

**जागतिकीकरण व्याख्या :**

जागतिकीकरणाची व्याख्या करताना डॉ. सुखदेव थोरात म्हणतात की, "आंतरराष्ट्रीय व्यापाराची दारे मोकळी करणे यासाठी सर्व देशांनी आपल्या अंतर्गत व्यवस्थेत बाजारपूरक बदल घडवणे म्हणजे जागतिकीकरण होय''[२] तर डॉ. मनोहर सुरवाडे यांनी ''आर्थिक गुलामगिरी हे जागतिकीकरणाचे मुख्य लक्षण असून जगातील अप्रगत विकसनशील राष्ट्रे त्यास बळी पडत आहेत, ती आजच्या घडीला शोषित तर श्रीमंत राष्ट्रे शोषक बनलेली आहेत. दळणवळणाच्या सुविधा, नवे तंत्रज्ञान आणि माहिती प्रसारणामुळे जागतिक स्तरावर अनेक राष्ट्रांनी परस्परांनी केलेले आर्थिक व्यवहार आणि व्यापाराविषयीचे करार म्हणजेच जागतिकीकरण होय''[३] असे म्हटले आहे. म्हणजेच भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण करून गरीब राष्ट्रांचे शोषण करणे हेच मध्यवर्ती सूत्र असल्याचे दिसते.

**जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कविता :**

खेडे आणि खेड्यातील जनजीवन या संदर्भात लिहिलेली कविता ग्रामीण कविता म्हणून ओळखली जात असली तरी तिचा मुख्य आशय ग्रामजीवन आणि ग्रामीण लोकांचे प्रश्न हाच असतो. ग्रामीण कविता ग. ल. ठोकळ यांच्यापासून लिहिली जात आहे. महात्मा फुले यांनी देखील ग्रामजीवन विषयक लेखन केल्याने तेच ग्रामीण साहित्याचे प्रेरणा स्थान आहेत. नंतरच्या कालखंडात ग्रामीण कवितेचा उत्तरोत्तर अधिक विकास होत गेला परंतु १९९०नंतर ग्रामीण कवितेचे विषय खूपच बदलून ते अधिक वास्तविक झाले, त्याचे मुख्य कारण म्हणजे जागतिकीकरणाचा खेडोपाडयावर झालेला परिणाम होय. शिक्षणामुळे ग्रामीण कवींचे आत्मभान जागे झाले आणि अधिक वास्तव मांडणी ते करू लागले. जगाचा पोशिंदा म्हणून खोटी सहानुभूती दाखवून शेतकरी वर्गाला हिणवण्याचा प्रकार समकालामध्ये होताना दिसतो, त्याबद्दल ग्रामीण कवितेतील शब्द आता अंगार होऊन येतात कारण आजपर्यंत झालेली शेतकऱ्याची अवहेलना आता कोणताच ग्रामीण कवी सहन करू शकत नाही. नव्वदोत्तर कवींनी लिहिलेली ग्रामीण कविता ही सशक्त आहे. याविषयी डॉ. पृथ्वीराज तौर म्हणतात की, ''ग्रामीण कवी म्हणून पुढे आलेले बहुतेकजण कोरडवाहू शेतकऱ्याची मुलं आहेत. दुष्काळ पाहत ते वाढलेले आहेत. सुकाळ व्हावा ही त्याची मनोमन धारणा आहे. छुप्या आणि दिसणाऱ्या शोषणाविरुद्ध लढा ते कवी उभारू पाहतात, शेतकऱ्याच्या आत्महत्या त्याना अस्वस्थ करतात आणि त्यामुळे समकालीन सामाजवास्तवावर, राजकारणावर ताशेरे ओढत, जुन्या काळाचे आठवणीचे घर उभे करतात.''[४] जागतिकीकरणानंतरचे लिहिते कवी उच्च शिक्षित असल्याने ग्रामीण भागाचे सूक्ष्म निरीक्षण, संवेदनशील आणि तीव्र आत्मभानातून ही कविता पुढे येत आहे तसेच बाजारू संस्कृती, भ्रष्ट व्यवस्था, दहशतवाद, सांस्कृतिक पडझड, हरवत चाललेली संस्कारमूल्ये, आणि ढासळलेला गावगाडा याचे अस्सल चित्रण शब्दबद्ध करणारी ही कविता आहे. याबाबत सखाराम देशमुख म्हणतात की, ''सद्यकालीन मराठी कविता विचार संपन्न ठरते. ही कविता फक्त औतफाटा, बैलजोडी, शेतमळा, घरकष्ट, एवढ्याच कक्षेत न अडकणारी आहे तर वर्तमान वाचून या कवितेला व्यक्त व्हायला आवडते .... आजची ही ग्रामीण कविता पुष्कळ चिंतनगर्भ आहे.''[५] शेती, माती, नाती, गोती, संस्कृती, दुष्काळ, कर्जबाजारीपणा, सुख, दुख, दैन्य, निसर्ग, आणि गावगाड्य या सगळ्याना ती सामावून घेत आहे


ISBN-978-93-5311-692-7

**जागतिकीकरणानंतर प्रसिद्ध झालेले कवितासंग्रह :**

अनेक कवींनी आपआपले कविता संग्रह प्रकाशित केले आहेत. त्यामध्ये प्रातिनिधिक स्वरूपात काही कवींच्या कवितासंग्रहाचा उल्लेख केला आहे. इंद्रजित भालेराव यांचे 'टाहो', 'पेरा'; श्रीकांत देशमुख यांचा 'बळीवंत'; जगदीश कदम यांचा 'झाडमाती', 'गस आणि गोंडर', 'नामदेव शेतकरी'; रमेश चिल्ले यांचा 'नागरून पडलेले शेत'; लक्ष्मण महाडिक यांचा 'कुणब्याची कविता', प्रकाश होळकर यांचा 'कोरडे नक्षत्र'; सदानंद देशमुख यांचा 'गावकळा'; किसन पाथळे यांचा 'रूमण', केशव सखाराम देशमुख यांचा 'पाढा', 'चालणारे अनवाणी पाय', 'अथक'; अशोक कोळी यांचा 'गावाकडल्या कविता'; एकनाथ पाटील यांचा 'खुन्टयावर टांगलेली दुःख'; संतोष पवार यांचा 'पिढीपेस्तर प्याटेमात'; विठ्ठल वाघ यांचा 'गावशीव'; बालाजी मदन इंगळे यांचा 'मेल नाही अजून आभाळ'; कल्पना दुधाळ यांचा 'सीझर कर म्हणतेय माती'; असे अनेक दर्जेदार वास्तविक जगणे मांडणारे कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत. जागतिकीकारणाचा शेती आणि प्रामुख्याने संपूर्ण खेड्यावर झालेला परिणाम या कवितासंग्रहातून कवींनी अतिशय ताकदीने मांडलेला आहे.

**जागतिकीकारणाच्या परिणामाचे विश्लेषण:**

शेतकरी जीवन, उध्वस्त गाव व कृषिसंस्कृती, दुष्काळ, दारिद्र्य संघर्ष, शिक्षण व्यवस्था, शोषण आणि उपेक्षा, असंवेदनशील राजकारण, वाढत्या शेतकरी आत्महत्या, प्रस्थापित व्यवस्थेला विरोध अशा अनेक विषयावर आजची ग्रामीण कविता भाष्य करते आहे.

जागतिकीकरणामुळे गावातील शेती क्षेत्र कमी होत गेले आणि नोकरीच्या मागे खेड्यातील तरुण धावू लागला पण नोकरी मिळत नाही. शिक्षण घेऊनही ग्लोबल व्हिलेजच्या झगमगटात शेतीची वाताहत होत आहे, हे वास्तव नाकारून चालणार नाही. आधुनिक जीवनमूल्ये आणि शहरी संस्कृतीचा खेड्यावर झालेला परिणाम लक्ष्मण महाडिक त्यांच्या कवितेतून व्यक्त करताना म्हणतात,

आता मिळते गावात व्हिस्की, सोडा, पेप्सी, कोला
मटक्याची मेंढी आता सारं ओपनच बोला
आता रानोमाळी इथं घरोघरी फोन आले
औतासंगे मोबाईल आता रुमाण्याशी डोले
खूप बदललं खेडं, झाल्या बुवा आणि बाया
सारं खोटं देव जाणं साऱ्या भोपळ्याच्या बिया [६]

जागतिकीकरणातून सारी ग्रामीण जीवनशैलीच पूर्ण बदलून गेली आणि गावात अनेक स्थित्यंतरे घडल्याने खेड्यातील अर्थशून्यता, बकालपण याचीही अनेक कवींनी नोंद घेतली आहे. जागतिकीकरणाच्या या घोंगाटामध्ये गावाचे सत्व आणि स्वत्व हरवून गेले. स्वावलंबन, धाडस, जिद्द, आत्माभिमान, हरवून शेतकरी आत्महत्या करतो, हे विदारक सत्य आहे. म्हणून इंद्रजीत भालेराव म्हणतात,

जागतिकीकरणाच्या एंड्रीनचा डबा
कुणी धुतला माझ्या निर्मळ गंगेत
निरागस विहार करण्याच्या नाकात
कुणी आणून कोंबला अचानक आकांत [७]

अशा वास्तव चित्रणातून गावाची उध्वस्त अवस्था ही केवल जागतिकीकरणामुळे झाली आहे हे कवी सांगतात. माहिती तंत्रज्ञानाचा अफाट विकास झाला आणि वाड्यावस्त्यावर ही जगातले टीव्हीच्या माध्यमातून नको ते घरात आले. शंकरराव दिघे आपल्या एका कवितेत म्हणतात,

गावापासून शहरापर्यंत डांबरी रस्ते, पूल बांधले
गावातले काही गेलं नाही शहरात, शहरंच सारी गावात घुसली
पेस्ट, ब्रश, रंग, रोग न उंची सॅंडल
ब्युटी पार्लर, पावभाजी, कच्ची दाबेली गावात आली
गावातली साळू शहरात जाऊन बारबाला झाली
तिची आई सांगते, चिमी सिनेमात गेली.[८]

ग्रामीण भागातील हजारो वर्षाची टिकून असणारी सांस्कृतिक परंपरा जागतिकिकरणाने कोलगडून गेली. कृषिसंस्कृतीवर त्याचे वाईट परिणाम झाले. हे कोणी नाकारणार नाही. समाजव्यवस्थाच भ्रष्ट झाली आणि भोगसत्ता शिरजोर होऊ लागली. धावा संस्कृती जोर धरत आहे. पिढ्यानपिढ्या जपलेले सांस्कृतिक धन नष्ट होत आहे. परकीय भांडवलशाहीच्या आक्रमणाला आपण बळी पडत आहोत. केशव देशमुख म्हणतात,

शहरांच्या आजुबाजूंना
जी शेतं उभी आहेत, त्यांनी जीव मुठीत धरून
श्वास कसाबसा घेणं सुरु ठेवलं आहे.[९]

यांत्रिकीकरणाचा शिरकाव जसा शेतात झाला तसा बेकारीचा प्रश्न आ वासून पुढे उभा राहिला आहे. मातीचीच माती होत असताना शासन स्तरावर कोणतीच योजना शेतकऱ्यांना फलदायी ठरताना दिसत नाही. सेझ सारख्या धोरणामुळे शेतीवर कारखाने उभे राहू लागले आणि कृषक मात्र भरडला जाऊ लागला. सरकारने त्याला वाऱ्यावर सोडून दिले आहे. औद्योगिक प्रकल्पाचा जबडा शेतीलाच गिळंकृत करत आहे. सर्वच बाजूनी शेतकरी कोंडीत सापडला आहे.

कॉम्प्युटरचे बटन दाबताच लख्ख उजळून निघाव सारं गाव


ISBN-978-93-5311-692-7

/2012
9318

तसं बंधाऱ्यावर पाय ठेवताच समोर दिसू लागतं
बापाचं उघडं नागडं जग, इन्टरनेट कनेक्ट करून
करावी कुणाशीही कधीही मनमुराद चॅटिंग
तसं नांगर, कुळव, दावण, कासरा, विहीर, पाचोळा
कुणाशीही कनेक्ट होऊन करावी चॅटिंग
तर इथून तेथून साऱ्या दुःख भऱ्याच कहाण्या [१०]

खेड्यातील सर्वसामान्य माणसाला असह्य होणारे हे जग, हे जागतिकीकरण खेडेच संपवू पाहत आहे की काय? हा प्रश्न सतत विचार करायला भाग पाडत आहे.

खते, कीटकनाशके, बी बियाणं, रासायनिक खते यांच्या अमाप वापराने शेती निकृष्ट होत आहे. टीव्हीवर कृषी विषयक चर्चा झडतात पण पोकळ चर्चा काय कामाच्या म्हणून कल्पना दुधाळ आपल्या कवितेत म्हणतात की,

धान्यांपासून मद्यार्क निर्मितीची चर्चा
घुमत राहते रानभर... मनभर.....
अनुदानाच्या उसण्या सावलीत
ग्लोबल एरीया नेटवर्कमध्ये
मी मात्र कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर [११]

या जागतिकीकरणातून मुळात माणूसच बाजूला फेकून दिला जात आहे. समाज व्यवस्थेची विस्कटलेली घडी कवयित्रीच्या संवेदनशील मनाला हादरवून टाकते. १९९० नंतरची ही कविता जागतिकीकरणाचे परिणाम शब्दबद्ध करणारी आहे. नव्याने निर्माण झालेल्या कृषी विषयक प्रश्नांचा वेध घेणारी आहे.

कुटुंब व्यवस्थाच मोडकळीस आल्याने खेड्यातील जिव्हाळ्याने नांदणारी माणसे, दिवसेंदिवस डांबरट होत चालली आहेत. अशोक कोळी यांनी आपल्या कवितेत हे विदारक वास्तव मांडले आहे.

घरातली घरं.... तिरकस दारं
फिरलं गावात राजकीय वारं
हाकता हाकता सारा गांवगाडा
नामशेष झाला चिरेबंदी वाडा [१२]

याबरोबरच वाढता दहशतवाद, मारामारी, चंगळवाद, वाढती बेकारी, बकाल शिक्षण व्यवस्था, मुलभूत गरजांच्या अपुऱ्या सोयी हे सर्व जागतिकीकरणामुळे झालेले परिणाम आहेत हे उघड उघड सत्य आहे.

थोडक्यात जागतिकीकरणाचे अनिष्ट परिणाम कृषी व्यवस्थेवर झाल्याने विद्रोहाच्या भूमिका घेऊन व्यवस्थेला जाब विचारण्यासाठी आजचे ग्रामीण कवी आपली कविता लिहिताना दिसतात. जागतिकीकरणामुळे गावचा चेहरा मोहरा पार बदलून टाकला आणि जीवनमान ढवळून निघाले, बदलले. अनुकरणाच्या हव्यासातून परकीय संस्कृतीची फॅशन प्रतिष्ठा पावत चालली आहे. एकूणच उध्वस्त झालेले गांव आणि शेतीमाती यांचे भीषण वास्तव चित्रण डॉ. केशव देशमुख पुढीलप्रमाणे मांडतात, ''हे ग्रामीण जीवनाचे वास्तव पुढे पुढे फार जीवघेणे स्वरूप धारण करू लागले. आज तर खेडी, खेड्यातील माणसे कमालीची उसवली, विस्कटली आहेत. भुईचे तुकडीकरण, तटे, नव्या पिढीचे आडमुठीकरण, त्यांचे चवचाल वर्तन, जुन्या पिढीच्या कष्टकऱ्यांचे फाटके तुटकेपण, छळणारे वर्तमान, चिंता वर्धित करणारा पुढचा भविष्यकाळ, आपले सर्वच काही हरवले आहे अशी काळजी धरणारी संपूर्ण मनोवस्था, कष्टाशिवाय पोसू पाहणारी ऐतखाऊ वृत्ती, अशा एक नव्हे तर डझनवारी विचित्र प्रश्नांचा आणि समस्यांचा आक्टोपस खेड्याच्या उशापायथ्याशी उग्र रूप धारण करतो आहे. आपल्या आठ ही आकडी हातानी आपल्या जीवघेण्या कवेत त्यांना आवळू पाहत आहे.''[१३] हे विदारक वास्तवरूप पाहिले की तळपायाची आग मस्तकाला जाते आणि कवी चिंतनाच्या पातळीवर आपली कवितेतून मनोगते व्यक्त करू लागतो. त्वेषाने जागतिकीकरणाला विरोध करू लागतो. त्याच्या परिणामाची नोंद तो घेतो.

**संदर्भ:**

१. कांबळे, उत्तम (संपा.) : 'जागतिकीकरणातील मराठी कविता', परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, प्रथमावृत्ती, २००९, पृ. ०७
२. थोरात, डॉ. सुखदेव : उनि. प्रस्तावना पृ. ०५
३. सुरवाडे, डॉ. मनोहर : 'जागतिकीकरण: ग्रामीण साहित्य', कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, २००९, पृ. ११
४. लुलेकर, प्रल्हाद/बडवे सतिश (संपा.): 'मराठवाड्यातील साहित्य', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, पृ. १०७
५. जाधव, डॉ. जयद्रथ (संपा.) : '१९९१नंतरचे ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि संदर्भ', संस्कार प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, २०१०, पृ. ४९
६. महाडिक, लक्ष्मण : 'कुणब्याची कविता', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती, २००३, पृ. ७६
७. भालेराव, इंद्रजीत : 'टाहो', प्रतिभास प्रकाशन, परभणी, तृतीयावृत्ती, २००८, पृ. ३१
८. दिंडे, शंकरराव : 'या शतकाचा सातबारा होईल कोरा', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, २००९, पृ. १

 ISBN-978-93-5311-692-7

Scanned with OKEN Scanner